**कृपया प्रसिध्दीसाठी -** **13 मार्च 2009**

## व्यंकैय्या नायडू रविवारी उत्तर मुंबईत भाजपाच्या महासंमेलनाला येणार

**मुंबई, शुक्रवार :** लोकसभा निवडणुकांचे बिगुल वाजले आहे. युतीचा गड असलेल्या उत्तर मुंबई लोकसभा मतदारसंघात भारतीय जनता पार्टीच्या सदस्यांचे महासंमेलन आयोजित करण्यात आले आहे. भाजपाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष श्री.व्यंकैय्या नायडू यांच्या प्रमुख उपस्थितीत रविवार 15 मार्च रोजी कोरा केंद्र, बोरीवली पश्चिम येथे हे महासंमेलन आयोजित करण्यात आले आहे, अशी माहिती भाजपा उत्तर मुंबई अध्यक्ष श्री.योगेश सागर यांनी आज काढलेल्या पत्रकात दिली आहे.

उत्तर मुंबई हा भाजपाचा बालेकिल्ला करणारे माजी केंद्रिय मंत्री श्री.राम नाईक, भाजपाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष श्री.नितीन गडकरी, तसेच भाजपा मुंबईचे अध्यक्ष व आमदार श्री.गोपाळ शेट्टी हे देखिल या संमेलनात मार्गदर्शन करणार आहेत, असे श्री.सागर यांनी यावेळी सांगितले.

भाजपाचे प्राथमिक सदस्य, तसेच हितचिंतक व समर्थक यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून महासंमेलन यशस्वी करण्याचे आवाहनही श्री.सागर यांनी केले आहे. एका बाजूला खासदार असूनही श्री.गोविंदा मतदारसंघात फिरकलेले नाहीत; तर दुसरीकडे लोकसभेत नसूनही श्री.राम नाईक यांनी जनसंपर्क व जनहिताची कामे सतत सुरु ठेवलेली आहेत. आमदार श्री.गोपाळ शेट्टी व भाजपा नगरसेवकांनीही आपल्या कामांनी उत्तर मुंबईत मोठ्या प्रमाणावर भाजपा समर्थक निर्माण केले आहेत. त्यामुळे सर्वांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहनही श्री.योगेश सागर यांनी केले आहे.

**(कार्यालय सचिव)**